मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय सहाय्यता मिळणेकरीता आजारांचे पुनर्विलोकन करणे, आजारांकरीता देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याची रक्कम नव्याने निश्चित करणे व रुग्णालय संल्गनीकरणासाठी निकष ठरविण्याकरिता समिती गठीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मुख्यमंत्री सचिवालय**
**परिपत्रक क्रमांक :- मुमंसनि-२०२५/प्र.क्र.०४/निधी कक्ष**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक :- २२.०१.२०२५**

**परिपत्रक :-**

मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातील "मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा" मार्फत अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये यासंदर्भात आर्थिक मदत मिळण्यासाठी असंख्य अर्ज प्राप्त होतात. सद्यस्थितीत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत २० आजारांवर आर्थिक सहाय्य करण्यात येते. तथापि, या आजारांव्यतिरिक्त देखील जीवीतास धोका असलेले आजार / गंभीर अपघातील रुग्ण असतात. या अनुषंगाने राज्यातील अशा रुग्णांना उपचाराअभावी जीव गमावू लागू नये म्हणून या २० आजारांचे पुनर्विलोकन करुन नवीन आजारांचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच या आजारांच्या उपचारावरील वैद्यकीय खर्चात देखील वाढ झाली असल्याने या आजारांकरीता देण्यात येत असलेल्या अर्थसहाय्याचे देखील पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे.

२. त्यामुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय सहाय्यता मिळणेकरीता आजारांचे पुनर्विलोकन करणे, आजारांकरीता देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याची रक्कम नव्याने निश्चित करणे व रुग्णालय संल्गनीकरणासाठी निकष ठरविण्याकरिता शिफारशी करणेबाबत खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत असून समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

| अ.क्र. | नाव / पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई | अध्यक्ष |
| २. | संचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ३. | संचालक, आयुष संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ४. | अधिष्ठाता, सर ज.जी. रुग्णालय समूह, मुंबई. | सदस्य |
| ५. | अधिष्ठाता, लोकमान्य टिळक स्मारक रुग्णालय, सायन, मुंबई. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६. | डॉ.आनंद बंग, मा.मुख्यमंत्री यांचे सल्लागार | सदस्य |
| ७. | डॉ. प्रविण शिनगारे, माजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ८. | डॉ.तात्याराव लहाने, माजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ९. | डॉ.रमाकांत देशपांडे, संचालक, एशियन कॅन्सर इस्टिट्युट. | सदस्य |
| १०. | डॉ.आश्विनीकुमार तुपकरी, सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर. | सदस्य |
| ११. | डॉ.अविनाश सुपे, माजी अधिष्ठाता, के.ई.एम.रुग्णालय, मुंबई. | सदस्य |
| १२. | डॉ.श्रीपाद बनावली,संचालक ॲकॅडमिक्स, टाटा मेमोरिअल सेंटर, परळ, मुंबई | सदस्य |
| १३. | डॉ.संजय ओक, संचालक, कौशल्य धर्मादाय रुग्णालय, ठाणे. | सदस्य |
| १४. | डॉ.बिच्छु श्रीरंग, प्राध्यापक व विभाग प्रमुख, नेफ्रोलॉजी विभाग, बॉम्बे हॉस्पीटल, मुंबई. | सदस्य |
| १५. | डॉ.जॉय चक्रवर्ती, चिफ ऑपरेटींग ऑफीसर, पी.डी.हिंदुजा रुग्णालय, मुंबई. | सदस्य |
| १६. | डॉ.अजय चौरासीया, प्राध्यापक व विभाग प्रमुख, हृदयविकार विभाग, नायर हॉस्पीटल, मुंबई. | सदस्य |
| १७. | डॉ.गौतम भन्साळी, कन्सल्टंट फिजिशिएन ॲण्ड इंटेसिविस्ट बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई. | सदस्य |
| १८. | डॉ.आनंद पाठक, वैद्यकीय संचालक, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट, नागपूर. | सदस्य |
| १९. | डॉ.माधव भट, सचिव, हॉस्पीटल मॅनेजमेंट कमिटी , दिनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे | सदस्य |
| २०. | कक्ष अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, (मुख्यमंत्री सहाय्यता निधी) | सदस्य सचिव |

**३. समितीची कार्यकक्षा खालीप्रमाणे राहील**

३.१ मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत मिळण्याकरीता सध्या अस्तित्वात असलेल्या २० आजारांपैकी इतर शासकीय योजनेत समाविष्ट असलेल्या आजारांचे पुनर्विलोकन करणे तसेच नवीन आजार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता मिळण्याकरीता समाविष्ट करणेबाबत शिफारस करणे.

३.२ रस्ते अपघात वगळून इतर अपघात प्रकरणामध्ये घ्यावयाच्या कागदपत्रांची निश्चिती करणे.

३.३ मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत मिळण्याकरीता आजारांना अनुज्ञेय असलेल्या अर्थसहाय्यांच्या रकमांचे पुनर्विलोकन करुन अनुज्ञेय रक्कम नव्याने निर्धारीत करण्याची शिफारस करणे.

३.४ मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाने वैद्यकीय उपचाराबाबत वेळोवेळी विविध विषयांच्या अनुषंगाने विचारणा केल्यास सदर समिती त्या विषयांबाबत शिफारस सादर करेल.

३.५ मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरीता रुग्णालय संल्लग्नीकरणासाठी (Empaneled) रुग्णालयाच्या तपासणीचे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना / केंद्र-राज्य सरकारच्या वैद्यकीय उपचाराबाबत असलेल्या इतर योजनांच्या धर्तीवर निकष ठरविणेबाबत शिफारस करणे.

३.६ सदर समितीचा कार्यकाळ पुढील आदेशापर्यंत असेल.

३.७ सदर शिफारशीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार वरिष्ठांचा असेल.

४. सदर समितीतील सदस्य त्यांचे नियमित कामकाज सांभाळून समितीचे कामकाज पाहतील. तसेच आपल्या शिफारशी ३० दिवसांत मा.मुख्यमंत्री कार्यालयास सादर करतील.

५. सदर परिपत्रक मुख्यमंत्री सचिवालयाच्या cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

SHARAD RAMLING GHAVATE
Digitally signed by SHARAD RAMLING GHAVATE
Date: 2025.01.22 18:25:04 +05'30'

**(शरद रा. घावटे)**

**कक्ष अधिकारी**

**मुख्यमंत्री सचिवालय**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
२. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
५. कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
६. संबंधित सर्व सदस्य
७. निवड नस्ती.